**प्रेसनोट** **दि.२६/०७/२०१९**

**<u>बिबवेवाडी पोलीस ठाणे,पुणे शहर</u>**

**<u>तडीपार आरोपीस ठोकल्या बेड्या</u>**

दि.१८/०७/२०१९ रोजी बिबवेवाडी पोलीस ठाणेकडील सर्व्हेलंन्स पथकातील पोलीस शिपाई स्मित चव्हाण व रुपनर मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे सो यांचे आदेशान्वये बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई स्मित चव्हाण यांना त्यांचे खास बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, बिबवेवाडी पोलीस ठाणे रेकॉर्डवरील तडीपार आरोपी नामे कुणाल मारुती कालेकर हा त्याच्या मित्राला भेटाण्यास अप्पर बस डेप्पो येथे आला आहे. अशी बातमी मिळाल्याने पो.शि.स्मित चव्हाण यांनी लागलीच मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांना कळवुन ते ओखळत असलेला नमुद आरोपी हा त्याचे तडीपार काळात बिबवेवाडी पोलीस ठाणे हद्दीत असल्याचे दिसल्याने त्यांनी त्यांचा पाठलाग करुन थोडयाच अंतरावरुन ताब्यात घेवुन त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचेकडे चौकशी करुन त्याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस ठाणेस महाराष्ट्र पोलीस अधिनियम १४२, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुरलीधर करपे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस शिपाई स्मित चव्हाण, रुपनर यांनी केली आहे.

